**प्रेसनोट** **दिनांक ३१/०३/२०१९**

## दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर

## लोकसभानिवडणुकीच्या पार्श्वभुमीवर पथसंचलन

लोकसभानिवडणुक २०१९ च्या अनुषंगाने दिनांक २९ मार्च २०१९ रोजी दत्तवाडी पोलीस स्टेशन हद्दीतील पर्वती दर्शन पोलीस चौकी येथुन पोलीस पथसंचलन आयोजित करण्यात आले होते. हे पथ संचलन वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केले होते.

पोलीसनिरीक्षक (गुन्हे) राजेंद्र सहाणे व दत्तवाडी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीसनिरीक्षक व पोलीसउप निरीक्षक ११, दामिनी मार्शल वरील महिला कर्मचारी आणि महिला व पुरूष असे एकुण ५४ कर्मचारी सहभागी झाले होते.या पथसंचलनामध्ये ९ एम.एम.कार्बाईन व ७.६ एस.एल.आर, एम.पी. सब मशीनगन, १२ बोअर पंप ॲक्शन अशा आधुनिक हत्यारांसह कर्मचारीसहभागी झाले होते.

हे पथसंचलन पर्वतीदर्शन पोलीसचौकी येथुन सुरू होऊन नुराणी मस्जिद मार्गे पंचशिल चौक- शिवदर्शनचौक- शिवदर्शन पहिली कमान- लक्ष्मी माता मंदिर- अरण्येश्वर- संजय नगर वसाहत- ल.रा. शिंदे हायस्कुल- लक्ष्मीनगर पोलीसचौकी-सहकारनगर- पाटे संस्कृती- शाहु वसाहत- गजानन महाराज चौक- महात्मा फुले वसाहत- रमणागणपती- प्रेमळ हनुमान मंदिर- कृष्ण प्रभु हॉस्पीटल अशा मार्गाने पायी संचलन करुन दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे समाप्त करण्यात आले. हे पथसंचलन सांयकाळी ०६/०० ते ०७/३० वा. दरम्यान पार पडले. पोलीसांचे पथसंचलन चालु असताना स्थानिक नागरिक मोठ्या प्रमाणात रस्त्यावर येवुन या पथसंचलनाबद्दल चांगला प्रतिसाद देवुन समाधान व्यक्त केले.

स्थानिक नागरिकांमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेबद्दल अधिकदृढ विश्वास निर्माण व्हावा व निवडणुकी मध्ये नागरिकांना निर्भयपणे मतदानकरता यावे व शहराची शांतता अबाधित राहावी या करीता अशा रितीने पोलीस पथसंचलन आयोजित करण्यात आले होते असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांनी सांगितले.

(देविदास घेवारे)
वरिष्ठ पोलीसनिरीक्षक दत्तवाडी
पोलीस स्टेशन, पुणे शहर.